

# 9 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी PDF DOWNLOAD

**इंडो-तिबेट सीमा पोलीस दलात प्रथमच दोन महिला अधिकारी :**

- भारत-चीन यांच्यातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालणाऱ्या इंडो तिबेट सीमा पोलीस दलात (आयटीबीपी) प्रथमच दोन महिला अधिकाऱ्यांचा रविवारी समावेश करण्यात आला आहे.
- तर एकूण **53 अधिकारी आयटीबीपीत सामील** झाले असून त्यांचे प्रशिक्षण मसुरी येथे झाले.
- तसेच आयटीबीपीच्या इतिहासावर आधारित 680 पानांच्या पुस्तकांचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. त्यात काही दुर्मीळ माहिती व छायाचित्रे आहेत.
- आयटीबीपीने महिलांना **2016** मध्येच स्थान दिले होते. त्यात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन या दलात सामील होण्याचा मार्ग खुला झाला होता, पण आतापर्यंत केवळ कनिष्ठ स्तरावरच महिलांचा समावेश होता.

eLearning Education Platform

**कोविशिल्ड-कोव्हॅक्सिन लसीचा संमिश्र डोस मिळणार :**

- संपूर्ण जगात करोना विरुद्धच्या लढाईत नव नवे प्रयोग केले जात आहेत. करोना विषाणूविरुद्धच्या लढाईत भारताला आणखी यश मिळताना दिसत आहे.
- कोव्हॅक्सिन आणि कोविशिल्ड लसीचे संमिश्र डोस दिल्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत. इंडियन कॉन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने याबाबतची माहिती दिली आहे.
- तर या **दोन्ही लसींची समिश्र डोस सुरक्षित असल्याचं सांगण्यात आलं** आहे. तसेच रोगप्रतिकार शक्ती वाढल्याचंही निष्पन्न झालं आहे.
- तसेच मिश्र लसीच्या शेवटच्या टप्प्यात चांगले परिणाम दिसल्यास करोना लसीकरण मोहीमेला वेग मिळणार आहे.

**9 ऑगस्ट 2021**

**गुगल डूडलवर झळकणारी भारतीय महिला :**

- भारताच्या पहिल्या महिला वैमानिक सरला ठकराल यांची काल **(8 ऑगस्ट) 107 वी जयंती** होती.
- भारताच्या पहिल्या महिला वैमानिक सरला ठकराल यांच्या जयंतीनिमित्ताने **गुगलने आपल्या डूडलच्या माध्यमातून अनोखी मानवंदना दिली** आहे.
- तर वर्षानुवर्षे चालत आलेली सगळी बंधन झुगारून देऊन अक्षरशः अवकाशात भरारी घेऊन भारतीय महिलांसाठी आदर्श ठरलेल्या सरला ठकराल यांची काल (८ ऑगस्ट) 107 वी जयंती होती.
- सरला ठकराल यांनी तब्बल 85 वर्षांपूर्वी जिप्सी मॉथ नावाच्या विमानाचे उड्डाण करून देशाची पहिली महिला वैमानिक होण्याचा मान मिळवला होता.
- तसेच गुगलकडून ठकराल यांच्या या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेण्यात आली आहे.

**बुमराहनं 'या' दिग्गज गोलंदाजाची केली बरोबरी :**

- जसप्रीत बुमराहची गणना जगातील सर्वात घातक गोलंदाजांमध्ये का केली जाते, हे त्याने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात सिद्ध केले.
- बुमराहने यजमानांविरुद्धच्या सामन्यात **एकूण 9 बळी** घेतले. पहिल्या डावात त्याने चार इंग्लिश फलंदाजांना बाद केले, तर दुसऱ्या डावात अर्ध्या संघाला म्हणजेच पाच फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला.
- तर आपल्या गोलंदाजीच्या बळावर त्याने भारताचा माजी वेगवान गोलंदाज झहीर खानच्या विक्रमाशी बरोबरी साधली.
- तसेच इंग्लंडने पहिल्या डावात **183 धावा आणि दुसऱ्या डावात 303 धावा** केल्या.
- जसप्रीत बुमराहने सामन्यात 110 धावा देऊन 9 बळी घेतले.
- बुमराहसह फक्त तीन भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडमध्ये 9 किंवा अधिक विकेट्स घेतल्या आहेत.

**दिनविशेष :**

- **9 ऑगस्ट** हा 'भारतीय स्वतंत्र चळवळीचा क्रांतिदिन'आहे.
- **सन 1942 मध्ये 9 ऑगस्ट** रोजी (क्रांतिदिन) भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या क्रांतीचे पर्व मुंबई येथून सुरु झाले.
- छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने सरहद गांधी खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन **9 ऑगस्ट 1993** मध्ये झाले.
- **सन 2000** मध्ये भाभा अणूसंशोधन केन्द्राचे (BARC) संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दिल्ली येथील इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेचा सुवर्णमहोत्सवी गौरव पुरस्कार जाहीर.

eLearning Education Platform

## August 2021 chalu ghadamodi PDF Download

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 1 | 1 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |

| Sr.No. | Name | Links | View PDF |
|---|---|---|---|
| 2 | 2 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 3 | 3 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 4 | 4 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 5 | 5 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 6 | 6 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 7 | 7 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |
| 8 | 8 ऑगस्ट 2021 चालू घडामोडी | Download | Download PDF |

Academy
eLearning Education Platform

# TET

# ONLINE टेस्ट सिरीज

## दररोज Online पेपर १५० मार्कचा

## LIVE TEST

### : टेस्ट सिरीजची वैशिष्ट्ये :

* TET परीक्षा होईपर्यंत WhatsApp मार्गदर्शन मोफत.
* टेस्ट १५० मार्कची असेल.
* गणित विषयाचे स्पष्टीकरण.
* online सराव पेपर व pdf स्वरुपात मिळतील.
* अशी सुविधा महाराष्ट्रात केवळ OOAcademy च्या टेस्ट सिरीजमध्ये उपलब्ध.
* online पेपर झाल्यावर तुमचे मार्क विषयानुसार तुम्हाला कळणार .
* संपूर्ण महाराष्ट्रात आपली रँक किती ते कळणार.

Download OOAcademy 8010457760